# महाराष्ट्र राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुला–मुलींसाठी 'श्रम विद्या शैक्षणिक कर्ज योजना'

१. **योजनेचे नाव :**

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला–मुलींसाठी **'श्रम विद्या शैक्षणिक कर्ज योजना'**

२. **उद्देश :**

राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबामधील इयत्ता बारावीपर्यंत शिकलेल्या मुला–मुलींच्या पदवी शिक्षणासाठी ०% ते ४% व्याजदराने शैक्षणिक कर्ज देणे.

३. **पात्रता :**

३.१ 'श्रम विद्या शैक्षणिक कर्ज योजना' फक्त महाराष्ट्राचे नागरीक असणाऱ्या सन २००३ ते सन २०२३ या दोन दशकांच्या कालावधीतील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला–मुलींसाठीच आहे. ही योजना महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील तसेच सर्व जाती–धर्मातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुला–मुलीसाठी लागू असेल.

३.२ बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यावसायिक अथवा पारंपारीक पदविका/ पदवी / पदव्युत्तर पदवी अशा कोणत्याही शाखेचे शिक्षण घेणारे विद्यार्थी या योजनेस पात्र असतील.

३.३ ही योजना शासकीय, स्वायत्त अथवा खाजगी महाविद्यालयांसाठी लागू असेल. परदेशी शिक्षणासाठी सुध्दा सदर योजना लागू असेल.

४. **कर्जमर्यादा :**

सदर योजनेसाठी कमाल कर्जमर्यादा ₹ १५.०० लाख इतकी राहील. शैक्षणिक संस्थेने विद्यार्थ्यांना दिलेले शैक्षणिक शुल्काचे विवरणपत्रक सोबत जोडणे आवश्यक राहील. सदर शुल्क विवरणपत्रकातील रक्कम व कमाल कर्जमर्यादा यातील कमी असणाऱ्या रक्कमे इतपत कर्जमर्यादा मंजूर केली जाईल व शुल्क विवरणापत्रकानुसार कर्जरकमेतून त्यांच्या शैक्षणिक शुल्काची रक्कम थेट संबंधित शिक्षण संस्थेच्या खात्यात जमा केली जाईल.

५. **व्याजदर :**

सदर योजनेसाठी कर्जाचा व्याजदर ₹ ५.०० लाखापर्यंत ०%, ₹ ५.०० लाखाचे वर ते ₹ १०.०० लाखापर्यंत २% व ₹ १०.०० लाखाचे वर ते ₹ १५.०० लाखापर्यंत ४% राहील.

६. **कर्ज कालावधी :**

कर्जाचा एकूण परतफेड कालावधी कर्ज वितरणाच्या तारखेपासून सवलतीच्या कालावधीसह जास्तीत जास्त १० वर्षाचा असेल.

७. **कर्जपरतफेड पध्दत** :

सदर कर्जासाठी सवलतीचा कालावधी शिक्षणाचा कालावधी अधिक १ वर्ष इतका राहील. कर्जाची प्रत्यक्ष परतफेड (हप्ते) शिक्षण पूर्ण झाल्यानंतर १२ महिन्यांनी सुरु होईल व उर्वरित कालावधीत समान मासिक हप्त्यात परतफेड करुन घेतली जाईल.

८. **प्रक्रिया शुल्क** :

सदर कर्जासाठी प्रक्रिया शुल्क आकारले जाणार नाही.

९. **कर्जास तारण / सहतारण** :

९.१ ₹ ५.०० लाखापर्यंतचे कर्जासाठी जामीनदारांची आवश्यकता नसेल.

९.२ ₹ ५.०० लाख ते ₹ १०.०० लाखापर्यंतचे कर्जासाठी एका सक्षम जामीनदाराची आवश्यकता असेल.

९.३ ₹ १०.०० लाखाचे वर ते ₹ १५.०० लाखापर्यंतचे कर्जासाठी दोन सक्षम जामीनदारांची आवश्यकता असेल.

९.४ कर्जाचे सुरक्षिततेसाठी बँकेमार्फत टर्म इन्श्युरन्स विद्यार्थ्याच्या नांवाने घेतला जाईल. सदर खर्च Reserve for Charity ला नांवे टाकला जाईल.

१०. **कर्ज योजनेची अंमलबजावणी व मंजूरीचे अधिकार** :

१०.१ सदर कर्ज योजनेसाठी कर्ज मागणी अर्ज व इतर अनुषंगिक कागदपत्रे व दस्तऐवज कायदा विभागाच्या मार्गदर्शनाखाली तयार करणे, कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे, कर्जाचे सुरक्षिततेसाठी बँकेमार्फत टर्म इन्श्युरन्स घेणे व कर्ज मंजूरीसाठी आवश्यक ती कार्यवाही बँकिंग (सीपीयु) विभागामार्फत करण्यात येईल.

१०.२ सदर कर्ज योजनेसाठी प्रॉडक्ट कोड, पीएल अकौंट नंबर व परपज कोड सीपीआयडी विभागामार्फत परिपत्रकान्वये प्रसृत केले जातील.

१०.३ सदर कर्ज योजनेअंतर्गत ₹ ५.०० लाखापर्यंत कर्ज मंजूरीचे अधिकार शाखा ज्या प्रादेशिक कार्यालयांतर्गत येत असेल त्या प्रादेशिक कार्यालयाचे प्रमुखास राहतील. ₹ ५.०० लाखाचे वरील कर्ज मंजूरीचे अधिकार मुख्य कचेरी स्तरावरील मंजूरी समितीस राहतील. मंजूरी समितीमध्ये (१) मा. व्यवस्थापकीय संचालक (आवश्यक) (२) ओएसडी (सरव्यवस्थापक), बँकिंग विभाग (३) ओएसडी (सरव्यवस्थापक), इतर विभाग (४) उपसरव्यवस्थापक, बँकिंग विभाग असे ४ सदस्य राहतील. मंजूरी समितीचा कोरम किमान ३ राहील. व्यवस्थापक / सहव्यवस्थापक, बँकिंग विभाग हे मंजूरी समितीचे सचिव म्हणून काम पाहतील. मात्र त्यांना मताधिकार रहाणार नाही.

१०.४ योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेले सर्व प्रस्ताव बँकिंग विभागामार्फत दर तिमाहीस मा. प्रशासक सभेसमोर माहितीस्तव सादर करण्यात येतील.

११. **आवश्यक कागदपत्रे** :

सदर योजनेचा लाभ मिळविण्यासाठी संबंधित मुला–मुलींना खालील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागेल.

११.१ इयत्ता बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका,

११.२ बारावीनंतरच्या महाविद्यालय / विद्यापीठातील प्रवेशाचा पुरावा,

११.३ शैक्षणिक शुल्क विवरण पत्रक (शाळा / कॉलेज / विद्यापीठ फी, होस्टेल फी, परीक्षा / लायब्ररी / लॅबोरेटरी फी, विद्यार्थ्यासाठीची सुरक्षा अनामत, बिल्डींग फंड (परतावा होणारी), पुस्तके / इक्विपमेंट / इन्स्ट्रुमेंट / गणवेश खरेदीची रक्कम, स्टडी टुर / प्रोजेक्ट वर्क / प्रबंध यासाठी येणारा खर्च),

११.४ शेतकरी पित्याच्या आत्महत्येबाबत तहसिलदारांचा दाखला / पोलीस पंचनामा / जिल्हाधिकारी कमिटीने मंजूर केलेली आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची यादी, सरपंच / ग्रामसेवक / पोलीसपाटील यांचा दाखला.

११.५ विद्यार्थी व आईचे आधारकार्ड / पॅनकार्ड / इलेक्ट्रिक बिल,

११.६ एकल माता (पालक) असल्याची नोंद,

११.७ वार्षिक उत्पन्नाचा दाखला (तलाठी / तहसिलदार),

११.८ वित्तीय संस्थेचा कर्ज थकबाकी दाखला,

११.९ नोकरीवर रुजू झाल्यानंतर बँकेस अवगत करण्याबाबतचे हमीपत्र,

११.१० वेळप्रसंगी आवश्यकतेनुसार अतिरिक्त कागदपत्रांची पुर्तता करावी लागेल,

११.११ 'ब' वर्ग सभासदत्व,

११.१२ प्रॉमिसरी नोट,

११.१३ कर्जरोखा,

११.१४ जामिनकी हमीपत्र.

उपरोक्त कागदपत्रांपैकी ११.११ ते ११.१४ कागदपत्रांचे नमुने बँकेकडून उपलब्ध करुन देण्यात येतील.

१२. <u>प्रोत्साहन</u> :

राज्य बँकेकडून श्रम विद्या शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत कर्ज घेतलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून जे विद्यार्थी सरासरी ७५% पेक्षा जास्त गुण मिळवून अंतीम परीक्षेत उत्तीर्ण होतील त्यांना ₹ ५०,०००/- व ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ₹ १.०० लाखापर्यंत पारितोषिक देण्यात येईल.

विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती / अनुदान प्राप्त झाल्यास सदरची रक्कम बँकेकडे कर्जापोटी जमा करावी लागेल.

-----

# ||श्रम विद्या शैक्षणिक कर्ज योजना ||

## दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. बँक लि., मुंबई

**(दि विदर्भ को–ऑप. बँक लि., सम्मिलित)**

**कर्जमागणी अर्ज**

अर्ज क्र. ___________

दिनांक : ___________

| विद्यार्थ्याच्या आईचा फोटो | विद्यार्थ्याचा फोटो |
|---|---|

मा.व्यवस्थापक,
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप. बँक लि.,
______________ शाखा,
_______________

महोदय,

**विषय : '<u>श्रम विद्या शैक्षणिक कर्ज' मागणीबाबत..</u>**

उपरोक्त विषयानुषंगाने, आम्ही विनंती करीत आहोत की, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुला–मुलीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे **'श्रम विद्या शैक्षणिक कर्ज'** योजनेअंतर्गत पाल्याच्या शिक्षणासाठी ₹ ________________ /– (अक्षरी रुपये ................................................ ........................................... ....................................) इतक्या रकमेचे कर्ज मिळावे.

| अ.क्र. | माहिती प्रकार | तपशील |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचे नांव | ................................................................................ |
| २ | जन्मतारीख | ........................ |
| ३ | लिंग | पुरुष / स्त्री |
| ४ | शैक्षणिक तपशील | |
| ५ | दुरध्वनी क्रमांक : आईचा<br>पाल्याचा | ..................................................<br>................................................. |
| ६ | ई–मेल (असल्यास) | ................................................ |

| अ.क्र. | माहिती प्रकार | तपशील |
|---|---|---|
| ७ | कायमस्वरूपी पत्ता | ........................................................................................<br>........................................................................................<br>........................................................................................<br>पीन कोड क्र. ................................... |
| ८ | आईचे नांव | ........................................................................................ |
| ९ | नियोजित शिक्षणाचा तपशील | |
| १० | नियोजित शैक्षणिक संस्थेचा तपशील | ........................................................................................<br>........................................................................................<br>........................................................................................ |
| ११ | शैक्षणिक फी जमा करण्यासाठी कॉलेज / महाविद्यालय / शैक्षणिक संस्थेच्य बँक खात्याचा तपशील | खात्याचे नांव : ..........................................................<br>खाते प्रकार : ...........................................................<br>खाते क्रमांक : ...........................................................<br>आयएफएससी कोड : .......................................................<br>बँकेचे नांव : .......................................................<br>शाखा : ......................................................... |
| १२ | स्वगुंतवणूक केली असल्यास | ₹ ................................ |

| अ.क्र. | माहिती प्रकार | तपशील |
|---|---|---|
| १३ | सक्षम जामिनदारांचा तपशील<br>जामिनदार क्र. १<br>फोटो<br><br>जामिनदार क्र. २<br>फोटो | १. नांव : ...............................................................<br>पत्ता : ..........................................................................<br>..........................................................................<br>..........................................................................<br>मोबाईल क्रमांक : ....................................................<br>आधार क्रमांक : ....................................................<br>पॅन क्रमांक : ....................................................<br>इलेक्ट्रिक बिल : ....................................................<br><br>२. नांव : ...............................................................<br>पत्ता : ..........................................................................<br>..........................................................................<br>..........................................................................<br>मोबाईल क्रमांक : ....................................................<br>आधार क्रमांक : ....................................................<br>पॅन क्रमांक : ....................................................<br>इलेक्ट्रिक बिल : .................................................... |

**टिप :**

- ₹ ५.०० लाखापर्यंतचे कर्जासाठी जामीनदारांची आवश्यकता नाही.
- ₹ ५.०० लाख ते ₹ १०.०० लाखापर्यंतचे कर्जासाठी एका सक्षम जामीनदाराची आवश्यकता.
- ₹ १०.०० लाखाचे वर ते ₹ १५.०० लाखापर्यंतचे कर्जासाठी दोन सक्षम जामीनदारांची आवश्यकता.

**सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडली आहेत.**

१. ७/१२ उतारा
२. इयत्ता बारावी परीक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका
३. महाविद्यालय / विद्यापीठातील पुढील प्रवेशाचा पुरावा
४. शैक्षणिक शुल्क विवरण पत्रक (शाळा / कॉलेज / विद्यापीठ फी, होस्टेल फी, परीक्षा / लायब्ररी / लॅबोरेटरी फी, विद्यार्थ्यासाठीची सुरक्षा अनामत, बिल्डींग फंड (परतावा

होणारी), पुस्तके / इक्विपमेंट / इन्स्ट्रुमेंट / गणवेश खरेदीची रक्कम, स्टडी टुर / प्रोजेक्ट वर्क / प्रबंध यासाठी येणारा खर्च)

५. शेतकरी पित्याच्या आत्महत्येबाबत तहसिलदारांचा दाखला / पोलीस पंचनामा / जिल्हाधिकारी कमिटीने मंजूर केलेली आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची यादी, सरपंच / ग्रामसेवक / पोलीसपाटील यांचा दाखला.

६. एकल माता (पालक) असल्याची नोंद

७. वार्षिक उत्पन्नाचा दाखला (तलाठी / तहसिलदार)

८. आई व विद्यार्थ्याचे आधार कार्ड

९. आई व विद्यार्थ्याचे पॅन कार्ड (असल्यास)

१०. इलेक्ट्रिक बिल

११. नोकरीवर रुजू झाल्यानंतर बँकेस अवगत करण्याबाबतचे हमीपत्र,

१२. विविध कार्यकारी सह. संस्थेचा कर्ज थकबाकी दाखला

**(अर्ज करतेवेळी मुळ कागदपत्रे सोबत आणावीत.)**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मुला-मुलींसाठी **'श्रम विद्या शैक्षणिक कर्ज'** योजनेअंतर्गत कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबतचे धोरण मला अवगत असून, त्यानुषंगाने असलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. उपरोक्त माहिती बरोबर असून आम्ही बँकेकडून घेतलेल्या शैक्षणिक कर्जाची परतफेड धोरणातील अटी व शर्तीनुसार करु.

( ______________________________ ) ( ______________________________ )

| | |
|---|---|
| **विद्यार्थ्याच्या मातेचे नांव व सही** | **विद्यार्थ्याचे नांव व सही** |
| **(अर्जदार)** | **(सहअर्जदार)** |

---

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या श्रम विद्या शैक्षणिक योजनेअंतर्गत ₹ ____________ च्या कर्जास मी / आम्ही जामीन राहण्यास तयार आहे / आहोत.

( ______________________________ ) ( ______________________________ )

| | |
|---|---|
| **जामिनदाराचे नांव व सही** | **जामिनदाराचे नांव व सही** |
| जामिनदार क्र. १ | जामिनदार क्र. २ |